अध्यापिका विद्यालय, सन्मित्र हाऊसिंग सोसायटी, राजारामपुरी, कोल्हापूर. या कॉलेजची प्राचार्य म्हणून मनोगत व्यक्त करताना विशेष आनंद होत आहे. 'राजातील माणूस व माणसातील राजा'असे ज्या थोर समाज सुधारक म्हणून छत्रपतींचे वर्णन केले जाते त्या राजर्षी शाहू महाराजांच्या स्नुषा पुण्यशील प्रिन्सेस इंदुमती राणीसाहेब यांनी "ज्ञान म्हणजे शिक्षण, शिक्षण म्हणजे स्वावलंबन व स्वावलंबन म्हणजे यशस्वी जीवनाची गुरूकिल्ली'' हा मंत्र ध्यानी धरून "महाराणी शांतादेवी गायकवाड गृहशास्त्र शिक्षण संस्थेची'' स्थापना सन एप्रिल १९५४ साली केली.

स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने पश्चिम महाराष्ट्र करवीर नगरीतील केवळ महिलांच्या व्यवस्थापनाखाली सुव्यवस्थित रीतीने चालत असलेली ही एक ख्यातनाम महिला शिक्षण संस्था. स्थापनेपासून ६७ वर्षांच्या कालावधीत संस्थेच्या १३ शाखा अत्यंत यशस्वीपणे कार्यरत आहे. त्यापैकी एक आमचे अध्यापिका विद्यालय. याची स्थापना सन १ जुलै १९७१ साली झाली ती तज्ज्ञ अध्यापिका निर्माण व्हाव्यात म्हणूनच. आज मितीस आमच्या अध्यापिका विद्यालयास ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. आमच्या कॉलेजमधून प्रशिक्षण घेऊन बाहेर पडणा–या हजारो प्रशिक्षित महिलांना ज्ञानदानाचे पवित्र कार्य करण्यासाठी अनेक संस्था प्रथम क्रमांकाने निवड करत असतात. प्रत्येक स्त्री शिक्षिका आपल्या क्षेत्रात आदर्शवत व्हावी म्हणून आमच्या कॉलेजचा अध्यापक वृंद नेहमीच दक्ष असतो. आम्ही अध्यापकांनी शिक्षण पदविका परिक्षेचा निकाल उत्तम राखण्याची परंपरा कायम ठेवली आहे. संपूर्ण वर्षभरात अभ्यास व अभ्यासेत्तर विविध उपक्रम राबवून आमच्या अध्यापक विद्यालयाने आजपर्यंत उच्च यश संपादन केले आहे.

अर्थात याचे सर्व श्रेय आमच्या कॉलेजचा अनुभवी, निष्णात, उत्साही, कामसू, मनमिळावू, गुणी असा अध्यापकाचार्य वृंद, सेव तत्पर कर्मचारी वर्ग तसेच आमच्या संस्थेच्या अध्यक्षा मा.मधुरिमाराजे छत्रपती, सेक्रेटरी मा.श्रीमती. आशा पाटील, यांचे वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शन व पाठीवरून फिरणारा प्रेमळ हात, जगदंबेची कृपा या सर्वांच्या सहकार्याने आम्ही उत्कर्षाप्रत जात आहोत. या सर्वांची मी कायम ऋणी आहे. अशीच उतरोतर उत्कर्षाकडे वाटचाल होवो, हीच सदिच्छा !

नहि ज्ञानेन सदृश्यम पवित्रमिह विद्यते !

धन्यवाद !

सौ.वर्षा अशोक सावंत.

प्राचार्य